# विद्या प्रतिष्ठानमध्ये मिळणार सायबर सुरक्षेबाबतचे धडे

**बारामती, ता. २५ :** येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आर्थिक साह्याबरोबरच सामाजिक व व्यावहारिक अनुभवातून सायबर सुरक्षेचे धडे मिळणार आहेत.

या उपक्रमाचे यंदाचे दुसरे वर्ष आहे. महाविद्यालयातील बी. बी. ए. (सी. ए.) विभाग व क्विकहिल फाउंडेशन या दोन संस्थेमध्ये कमवा आणि शिका या उपक्रमाअंतर्गत नुकताच सामंजस्य करार केला आहे. या करारावर प्राचार्य डॉ. भरत शिंदे व क्विक हिल फाउंडेशनचे अजय शिर्के यांनी स्वाक्षरी केली.

शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना सामाजिक जागरूकतेमध्ये सक्षमपणे सहभागी करून घेणे हा या उपक्रमामागील उद्देश आहे. सलमा शेख या समन्वयक तर शिवानी छेडे, सागर मेरावी, रितेश धापटे, ऋतुजा कळसकर हे विद्यार्थी क्लब मेंबर म्हणून काम पाहतील. यासाठी प्राचार्य शिंदे, उपप्राचार्य डॉ. श्यामराव घाडगे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब काशीद, महेश पवार, गजानन जोशी, किशोर ढाणे, गौतम कुदळे, डॉ. जगदीश सांगवीकर यांचे मार्गदर्शन मिळाले. विशाल शिंदे, अनिल काळोखे, पूनम गुंजवटे, अक्षय भोसले, वैशाली पेंढारकर, कांचन खिरे, अक्षय शिंदे यांनी सहकार्य केले.



**बारामती :** सायबर सुरक्षेबाबतच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्यानंतर मान्यवर.